मोलोयत्रम सायुलद्ये

9/304 60 जाहिरात क्र. 29/10/11

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड,
पुणे - १६
जा. क्र. झोपुप्रा/तां५/प्र.क्र.११/१९३३/११
दिनांक – २०/१०/२०११

## "झोपडपट्टी निर्मुलन आदेश"

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो. - २००४ / प्र. क्र. - २१३ / झो. प. सु. - १ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतूदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना दि. ०१/१२/२००५ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अंतिमतः प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) (१) मधील तरतुदीनुसार खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. झोपुप्रा/तां ५/१३६० दि. १३/०७/२०११ अन्वये 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित केलेले आहे. सदरचा आदेश हा महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात आणि दोन स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक **मे. टारगेट फायनान्स प्रा.लि** यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांनी झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. सदरच्या **अंतिम यादी प्रमाणे सदर फा. प्लॉ. क्र. १६१ या मिळकतीवर एकूण**

९२ झोपड्या असून पैकी ७२ निवासी व १ बिगर निवासी असे ७३ झोपडीधारक पात्र ठरले आहेत. पात्र लाभार्थी पैकी ६३ लाभार्थीनी ( ८६% ) पुनर्वसन योजनेस विकासकास संमती दिली आहे.

आणि ज्याअर्थी विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार घोषित झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवणेसाठी प्रस्ताव दाखल केलेला असून पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे प्रस्तावित केले आहे. प्रस्तुत ठिकाणी 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / घरे / झोपडया हया नियोजित कार्यक्रमानुसार पाडून टाकून जमिन खुली करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, महेश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र' म्हणून घोषित करीत आहे. सदर क्षेत्रातील झोपडया / बांधकामे हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून ६ आठवडयाच्या आत पाडून टाकून जमीन खुली केली पाहिजे. सदरचा आदेश हा खालील अटींवर देण्यात येत आहे.

१. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजूर करून प्रत्यक्ष बांधकाम सुरू केले पाहिजे.
२. विकसकाने योजनेचे काम चालू करण्यापूर्वी विस्थापित होणाऱ्या पात्र लाभार्थींची राहण्याची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक सर्व सुविधांसह स्वखर्चाने केली पाहिजे.
३. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण केले पाहिजे.
४. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळयांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.
५. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या निदेशानुसार विलंब कालावधी-साठी दंड आकारून मुदतवाढ देण्यात येईल.
६. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसल्यास विकसकावर उक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.
७. पात्र लाभार्थ्यांची तात्पुरती पर्यायी व्यवस्था केल्यानंतर/ संक्रमण शिबीरात स्थलांतरीत केल्यानंतर विकसकाने योजना क्षेत्रातील सर्व झोपडया / बांधकामे पाडून

टाकून जागा रिकामी केली पाहिजे.

८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेतंर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधीत होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत उक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| **ज़मिनीचा तपशील** | **क्षेत्र ( चौ. मी.)** | **चतु:सिमा** |
|---|---|---|
| घोरपडे पेठ, नगररचना क्र.३,<br>फा. प्लॉ.क्र. १६१<br>(सि.स.नं.३६२ व ३६३ पैकी<br>अ स.नं. ५३९अ/१६ ब) | १५७१.१७ चौ. मी. | पुर्व-फा. प्लॉ.क्र. १६२,<br>दक्षिण-फा. प्लॉ.क्र. १६३.<br>पश्चिम- सि.स.नं.३३६,३३५<br>उत्तर- रस्ता |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

**(महेश पाठक)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,

"सत्यप्रत"
सहाय्यक अभियंता क्र.
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र
पुणे-१६.